सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.

डॉ. सविता कुलकर्णी
संचालक (अतिरिक्त कार्यभार)

संदर्भ क्र. विविमं/२०२६–२७/१३३ दिनांक : २७/०७/२०२६.

प्रति,
मा. प्राचार्य/ मा. संचालक,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित अहिल्यानगर जिल्ह्यांतील
सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था.

**विषय : विद्यार्थी कल्याण अधिकारी (SWO) यांच्या जिल्हानिहाय वार्षिक नियोजन सभेबाबत.**

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेली **अहिल्यानगर जिल्ह्यांतील** सर्व महाविद्यालये/ मान्यताप्राप्त परिसंस्थामधून नियुक्त विद्यार्थी कल्याण अधिकारी (SWO) यांची शैक्षणिक वर्ष २०२६–२७ ची वार्षिक नियोजन सभा गुरूवार, दिनांक ३० जुलै, २०२६ रोजी न्यू आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, अहिल्यानगर (स्वायत्त) (राजर्षी शाहू सभागृह) येथे पुढीलप्रमाणे जिल्हानिहाय आयोजित करण्यात आली आहे.

| दिनांक | जिल्हा | नाव नोंदणी व भोजन वेळ | सभा वेळ | महाविद्यालये | स्थळ |
|---|---|---|---|---|---|
| गुरूवार, दिनांक ३० जुलै, २०२६ | अहिल्यानगर | दुपारी ०१.०० ते दुपारी ०२.०० | दुपारी ०२.०० ते सायं. ०४.०० | अहिल्यानगर जिल्हयातील सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था | न्यू आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज,अहिल्यानगर (स्वायत्त) **(राजर्षी शाहू सभागृह)** |

**सदर सभेपुढील विषय :**

१. विद्यार्थी अपघात विमा योजना मार्गदर्शन.
२. शैक्षणिक वर्ष २०२६–२७ मधील विविध योजना व उपक्रमांचे मार्गदर्शन व वार्षिक नियोजन करणे.
३. विविध योजना व उपक्रमांचे ऑनलाईन पद्धतीने अर्ज, अहवाल भरण्याबाबत आणि योजनेबाबत येत असणाऱ्या अडचणीबाबत मार्गदर्शन करणे.
४. विभागीय/जिल्हास्तरीय युवक महोत्सवाचे आयोजनाबाबत.
५. आयत्या वेळचे विषय.

आपल्या महाविद्यालयातील/मान्यताप्राप्त परिसंस्थेतील फक्त विद्यार्थी कल्याण अधिकारी (SWO) यांना सदर सभेस वरीलप्रमाणे विहित दिनांकास व वेळेत उपस्थित राहण्याबाबत सूचित करावे.

तसेच विद्यार्थी कल्याण अधिकारी यांनीही आपला प्रतिनिधी परस्पर पाठवू नये याबाबतही आपण लक्ष घालावे. कळावे, ही विनंती.

**(प्रा. डॉ. सविता कुलकर्णी)**
संचालक (अतिरिक्त कार्यभार),
विद्यार्थी विकास मंडळ